| Publication | Punya Nagri Smart Mumbai (Sup) | Date | 09.06.2017 |
|---|---|---|---|
| Edition | Mumbai | Page | 01 |

# मुंबई विद्यापीठात दोन नवीन व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम

**मुंबई :** जगातील आघाडीच्या विद्यापीठाच्या सहकार्याने व मास्टर माय लाइफ इकयु एज्युकेशनतर्फे हेमंत लवंगारे यांच्या मदतीने सुरू करण्यात आलेले व भारतात अद्यापि सुरू न झालेले व्यवसायाभिमुख दोन मास्टर डिग्री कोर्स हे अत्यंत उपयुक्त आहेत, असे मत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी गुरुवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले. या वेळी गरवारे इन्स्टिट्युटच्या सहसंचालक शिल्पा बोरकर व शिक्षणतज्ज्ञ हेमंत लवंगारे उपस्थित होते. या वेळी बोलताना देशमुख म्हणाले, काळाच्या ओघात शिक्षण पद्धती बदलत आहेत व त्या बदलल्या पाहिजेत. असाच प्रयोग 'इमोशनल इंटेलिजन्स ॲण्ड ह्युमन रिलेशन' व 'मास्टर्स इन इमोशनल ॲण्ड लाइफ कोचिंग' या दोन अभ्यासक्रमातून होत आहे. समाजातील प्रत्येक प्रश्नाला उत्तर देणारा, उपेक्षित घटकाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला लावणारा हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर स्वतःच्या पायावर उभे राहायला व मेंदूत सुरू असणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रियेला सामोरे जाणारा हा अभ्यासक्रम आहे. ७०० कोटींपेक्षा जास्त लोकसंख्या जगाची होत आहे. त्यात आपण नेमकी कोणती भूमिका घेतली पाहिजे, असे सांगणारा हा अभ्यासक्रम आहे. गरवारे इन्स्टिट्युटमध्ये हा अभ्यासक्रम सुरू होत असून मुंबई विद्यापीठाची मान्यता असणारा अभ्यासक्रम आहे.